आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ मार्च २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- घरगुती गॅसच्या टंचाईबाबत राज्य सरकारने योग्य उपाययोजना कराव्या असे विधानसभा अध्यक्षांचे निर्देश

- राज्यात सध्या खताचा तुटवडा नाही, अशी कृषीमंत्र्यांची विधानसभेत ग्वाही

- रिलायन्स उद्योगसमूह अमेरिकेतल्या ३०० अब्ज डॉलर्सच्या तेलशुद्धिकरण प्रकल्पात भागीदार

**आणि**

- १२ वर्ष कोमात राहिलेल्या रुग्णाची जीवरक्षक प्रणाली हटवण्याला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

**<><><><><>**

अमेरिका - इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाई जाणवत आहे, यासंदर्भात राज्यात गॅसचा किती साठा आहे आणि गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना राबवत आहे याची माहिती द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली. तुटवड्यामुळे मुंबई आणि नागपूर या शहरांमध्ये ३० टक्के हॉटेल बंद झाली आहेत, असं वडेट्टीवार यांनी सांगितलं. यावर हा प्रश्न केंद्र सरकारशी संबंधित असला तरी राज्य सरकारने योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशा सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिल्या.

राज्यात सध्या खताचा तुटवडा नाही, ३९ लाख ७९ हजार मेट्रिक टन खताचा साठा उपलब्ध आहे अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. जयंत पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. खताची अधिक दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर सहा महिन्यांच्या निलंबनाची कारवाई केली जाईल असं भरणे यांनी नाना पटोले, सुरेश धस यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

माजी सैनिकांना देण्यात येणाऱ्या जमिनीचं वर्ग एक मध्ये रुपांतरण करण्याचा निर्णय या महिनाअखेरीस घेतला जाईल असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. तसंच

माजी सैनिक आणि भूमिहीनांना कमीत कमी अधिमूल्य आकारलं जाईल असं ते म्हणाले. श्वेता महाले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

<><><><><>

एसटी महामंडळात चालक आणि वाहक या पदांसाठी १७ हजार ६४२ कर्मचाऱ्यांच्या भर्तीचा प्रस्ताव विभागानं राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर ताबडतोब ही मेगाभर्ती होईल, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. श्रीकांत भारतीय यांनी एसटी महामंडळातल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. महामंडळाच्या मालकीच्या बसची संख्या वाढली असून कर्मचारी अपुरे पडत असल्यानं कंत्राटी पद्धतीनं काही कर्मचारी घेतले जात आहेत. या आगामी मेगाभर्तीतही महामंडळासाठी काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्यायचा प्रयत्न करू, असं आश्वासन त्यांनी दिलं. या कर्मचाऱ्यांचा पगार सध्या दर महिन्याच्या १० तारखेला होतो. त्यामुळे काही आर्थिक अडचणी त्यांच्यासमोर नाहीत, असं प्रतिपादनही त्यांनी केलं. प्रवीण दरेकर आणि अनिल परब यांनीही या प्रश्नावरच्या चर्चेत भाग घेतला.

<><><><><>

सातारा जिल्ह्यातल्या सावरी गावात गेल्या वर्षीच्या डिसेंबर महिन्यात अवैधरीत्या एमडी हा अंमली पदार्थ बनवण्याच्या कारखान्यावर झालेल्या कारवाईत अटक केलेल्या ११ जणांवर मकोका लावला आहे, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. शशिकात शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><><>

चर्नी रोड परिसरातल्या मराठी भाषा भवनाच्या एका भागाचं लोकार्पण पुढच्या वर्षी फेब्रुवारीपर्यंत होईल, तसंच ऐरोलीच्या उपकेंद्राचं कामही वेगानं पूर्ण करू, असं आश्वासन मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिलं.

<><><><><>

आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धामुळे गॅस आणि इंधनांचा तुटवडा निर्माण होऊन जनजीवनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या परीक्षा सुरू असल्यानं त्यांची गैरसोय होऊ नये, त्यामुळे त्यांना कोणताही त्रास होणार नाही,

याची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी आणि योग्य ती व्यवस्था करावी, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. प्रसाद लाड, प्रवीण दरेकर आणि सचिन अहिर यांनी या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><>

महिला या फक्त शेती करत नाहीत, तर शेतीचं भविष्य घडवत आहेत. महिला शेतकरी समृद्ध झाल्या, तरच राज्य समृद्ध होईल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज केलं. आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि संयुक्त राष्ट्र संघटनेनं जाहीर केलेल्या आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६च्या निमित्ताने विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात त्या बोलत होत्या. महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार पुढच्या अधिवेशनात विशेष विधेयक आणेल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><>

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमुळे मुंबईच्या जेएनपीए बंदरात कंटेनर अडकलेल्या फळे आणि भाजीपाला कंटेनरवरील साठवण किंवा थांबा कालावधी शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी ही माहिती दिली. यासोबतच शीतगृह कंटेनर विद्युत जोडणी शुल्कात ८० टक्के सवलत देण्याचा तसंच नवीन जहाज उपलब्ध होईपर्यंत साठवणूक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेतला आहे. राज्यानं केलेल्या विनंतीवरून केंद्र सरकारनं याबाबत कार्यवाही केल्याचं त्यांनी सांगितलं. सध्या सुमारे २५० कंटेनर जवाहरलाल नेहरू बंदरावर, तर आणखी सुमारे १५० कंटेनर गुजरातमधल्या मुंद्रा बंदरावर थांबलेले आहेत.

<><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रिलायन्स उद्योग समूहासोबत सुमारे ३०० अब्ज अमेरिकन डॉलरची भागीदारी जाहीर केली आहे. या भागीदारीतून अमेरिकेतला पहिला तेलशुद्धीकरण कारखाना सुरु केला जाणार आहे. अमेरिकन ऊर्जा क्षेत्रातला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचं ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज केरळ आणि तामिळनाडूच्या दौऱ्यावर आहेत. केरळमध्ये, एर्नाकुलम इथं एकंदर १० हजार ८०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन

आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. तमिळनाडूमध्ये, तिरुचिरापल्ली इथं एकंदर ५ हजार ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं ते उद्घाटन करतील.

<><><><><>

एलपीजी गॅसच्या तुटवड्यावरून विरोधकांनी आज लोकसभेत गदारोळ केल्यामुळे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. सकाळी कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्ष सदस्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनाजवळ जमून घोषणाबाजी करायला सुरुवात केली. विरोधकांच्या घोषणाबाजीतच पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र, तरीही विरोधकांचा गदारोळ सुरू राहिला. वारंवार विनंती करूनही गदारोळ सुरूच राहिल्यानं सैकिया यांनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं.

सहकारी क्षेत्रातली भारत टॅक्सी ही सेवा पुढच्या दोन ते तीन वर्षांत सर्व मोठ्या शहरांमध्ये आणि तालुक्यांमध्ये विस्तारली जाईल, अशी माहिती राज्यसभेत सहकार राज्यमंत्री किशन पाल गुर्जर यांनी याबाबतच्या प्रश्नावर दिली. सहकारी संस्थाकडून रोजगार निर्मितीबाबतचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्याला उत्तर देताना ते म्हणाले की, चालकांना सक्षम करण्यासाठी आणि उत्पन्न वाढवण्यासाठी भारत टॅक्सी सुरू करण्यात आली आहे.

<><><><><>

लोकसभेच्या सभापतींनी विरोधी पक्षनेत्याला बोलायची संधीच न देणं, विरोधकांना मुद्दे मांडण्यासाठी वेळ न देणं हे भारतीय लोकशाहीच्या इतिहासात प्रथमच घडत असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली. ओम बिर्ला यांच्यावरच्या अविश्वास प्रस्तावावरच्या चर्चेवेळी ते बोलत होते. विरोधी पक्षांच्या काही नेत्यांच्या अहंकारापोटी हा ठराव आणल्याचं भाजपचे रविशंकर प्रसाद म्हणाले. भारताचं संविधान, संसद आणि निवडणूक आयोगाविरुद्ध राहुल गांधी टीका करतात. तसंच परदेशात भाषण करताना गांधी यांनी आपले शब्द जपून वापरावेत असं प्रसाद म्हणाले. लोकसभेत या विषयावर अजूनही चर्चा सुरू आहे.

<><><><><>

गेली १२ वर्ष कोमात असलेल्या ३२ वर्षीय रुग्णाला इच्छामरण देण्याची परवानगी आज सर्वोच्च न्यायालयानं दिली. रुग्णाच्या प्रकृतीत काहीही बदल होण्याची शक्यता नसल्याच्या कारणावरून रुग्णाच्या आईवडिलांनी इच्छामरणाबाबतची याचिका दाखल केली

होती. त्यावर न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं हा ऐतिहासिक निर्णय दिला. जगण्याच्या हक्कात, 'सन्मानानं जगणं' असा अर्थ अभिप्रेत असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. रुग्णाची प्रतिष्ठा कायम ठेवून त्याची जीवरक्षक प्रणाली काढून घेण्याची प्रक्रिया राबवावी, असे निर्देश खंडपीठानं दिले आहेत.

<><><><><>

छत्तीसगडच्या सहा जिल्ह्यांमधल्या १०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. त्यांच्यावर एकूण सुमारे ३ कोटी ९५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. केंद्रीय गृह मंत्रालयानं आज ही माहिती दिली. देश येत्या  महिनाअखेरपर्यंत नक्षलवादापासून मुक्त होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी  व्यक्त केला आहे.

<><><><><>

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारे गोदावरी गौरव पुरस्कार काल नाशिकमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रदान करण्यात आले. नाट्य क्षेत्रासाठी प्रशांत दामले, विज्ञान संशोधनासाठी डॉ. अनिरुद्ध पंडित, वृक्षारोपण चळवळीसाठी अभिनेता सयाजी शिंदे, चित्रकलेसाठी चंद्रमोहन कुलकर्णी, शास्त्रीय संगीत साधनेसाठी सरोदवादक उस्मान खान आणि साहसी मोहिमांच्या माध्यमातून युवकांना प्रेरणा देणारे गिर्यारोहक आशिष माने यांना गोदावरी सन्मान देऊन गौरवण्यात आलं.

<><><><><>

लातूरमध्ये झालेल्या राज्यस्तरीय 'महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धेत कोल्हापूरचा मल्ल  रोहन पवार यानं विजेतेपद पटकावलं. पुण्याच्या रामा कांबळे याच्यावर ११ गुणांनी विजय मिळवत त्यानं  हा मानाचा किताब पटकावला.

तरुणांनी शरीर आणि मन मजबूत करण्यासाठी कुस्ती या खेळाकडे वळावं, हा या स्पर्धेच्या आयोजनामागचा मुख्य उद्देश असल्याचं आयोजकांनी सांगितलं.

//<><><><><>//